**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ६०/२०१८** | **दिनांक २७/०७/२०१८** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविद्या विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविद्या विभाग
९४२२३७४००१

**प्रा. विरेश चव्हाण,**
तांत्रिक अधिकारी,
कृषिविद्या विभाग
९४२२०६५३४४


| मागील हवामान सारांश दि. २३/०७/२०१८ ते २७/०७/२०१८ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | १५.२ |
| पाऊस (मिमी) १/१/१८ पासून | : | २१८७.० |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | ३६३३.५ |
| कमाल तापमान (अं.से) | : | २७.५–२९.० |
| किमान तापमान (अं.से) | : | २७.५–२४.५ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ९४–१९८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ८९–९८ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ८.४–१०.० |

| हवामान पूर्वानुमान (२८/०७/२०१८ सकाळी ८:३० पासून ०१/०८/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **हवामानांचे घटक** | : | **२८/०७** | **२९/०७** | **३०/०७** | **३१/०७** | **०१/०८** |
| पाऊस (मिमी) | : | ८ | ६ | ६ | ९ | ८ |
| कमाल तापमान (अं.से) | : | २९ | २९ | २९ | ३० | ३० |
| किमान तापमान (अं.से) | : | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ७ | ७ | ७ | ६ | ५ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ८३ | ८४ | ८३ | ८४ | ८३ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ७४ | ७४ | ७४ | ७६ | ७५ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ०१३ | ०१३ | ०११ | ०११ | ०१२ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

## :हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक २८ जुलै ते १ ऑगस्ट, २०१८ पर्यंत पावसाची शक्यता आहे. दिनांक २८ जुलै ते १ ऑगस्ट, २०१८ पर्यंत अवकाश मेघाच्छादित राहिल. दिनांक २८ जुलै ते १ ऑगस्ट, २०१८ पर्यंत वाऱ्याचा वेग ११ ते १३ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **नागली** | **लावणी** | • पुर्नलागवडीसाठी ३० दिवसांची रोपे वापरावीत. अधिक उत्पन्न मिळण्यासाठी रोपे २० **X** १५ सें. मी. अंतरावर ठोंबा पध्द्तीने उथळ आणि उभी लावावीत. ठोंबे उताराच्या आडव्या दिशेने करावेत.<br>• लावणी करताना प्रती हेक्टरी ४० किलो नत्र, ४० किलो स्फुरदची मात्र द्यावी. खते फोकून न देता ठोंब्यामध्ये द्यावीत. |
| **भात** | **मशागत** | • पर्जन्यमान कमी असल्यामुळे भात खाचरामध्ये पाण्याची योग्य पातळी राहिल याची काळजी बांधबंदीस्ती करून घ्यावी.<br>• बांधावरील खेकडयांचा बंदोबस्त करावा त्यासाठी १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पा.मि. ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम किंवा पा.मि. कार्बारिल भूकटी १०० ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळया तयार करून प्रत्येक बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बीळे उकरली जातील अशा बिळात परत अमिष वापरावे.<br>• पर्जन्यमान कमी असल्यामुळे भात पिकावर निळे भुंगेरे किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, प्रादुर्भाव दिसून येताच त्याच्या नियंत्रणासाठी क्युनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २ लिटर किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही ३२५ मिली किंवा लॅमडासायहॅलोथ्रीन ५ टक्के २५० मिली यापैकी एक किटकनाशक ५०० लिटर पाण्यात मिसळून १ हेक्टर क्षेत्रावर फवारावे.<br>• पिकाच्या लागवडीच्या वेळेनुसार पिक एक महिन्याचे झाले असेल तर नत्राचा दुसरा हप्ता हेक्टरी ४० किलो या प्रमाणात देण्यात यावा. |
| **आंबा, काजू** | **लागवड** | • १० वर्षावरील हापूस जातीच्या आंबा झाडास आकारमानानुसार पॅक्लोब्युट्रॅझॉल द्यावे. प्रत्येक झाडाचा पूर्व–पश्चिम व दक्षिण–उत्तर व्यास मोजून त्याची सरासरी काढून प्रती मिटर व्यासास ०.७५ ग्रॅम क्रियाशील घटक पॅक्लोब्युट्रॅझॉल (३ मिली कल्टार) द्यावे. पॅक्लोब्युट्रॅझॉलची आवश्यक मात्रा ३ ते ५ लिटर पाण्यात मिसळून १० ते १२ से.मी. खोल असे सम अंतरावर २५ ते ३० खड्डे मारून त्यात द्रावण समप्रमाणात ओतावे, नंतर खडडे मातीने बुजवून टाकावे. पावसाची तीव्रता जास्त असलेल्या दिवसात पॅक्लोब्युट्रॅझॉल देवू नये. |
| **नारळ/ सुपारी** | –– | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे.<br>• तीन वर्षावरील प्रत्येक सुपारीच्या झाडास १ घमेल शेणखत किंवा कंपोस्ट खत, १२ किलो हिरवळीचे खत, १६० ग्रॅम युरिया, ५०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट, १२५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश खत द्यावे.<br>• नारळ आणि सुपारी बागेत पावसाचे अतिरक्त पाण्याचा निचरा होणेसाठी चर खोदून घ्यावेत.<br>**टिप:–** पावसाची तिव्रता कमी असताना खते द्यावीत. |
| **भाजीपाला आणि फळबाग रोपवाटीका** | – | • वेलवर्गीय भाज्यांना काठीचा आधार द्यावा. भाजीपाला क्षेत्रातील तणांचा बंदोबस्त करावा. तसेच प्रती गुंठ क्षेत्रास ७२० ते ८५० ग्रॅम युरिया खताचा एक तृतीयांश हप्ता द्यावा अणि मंडपाची व्यवस्था करावी.<br>• हवामान अंदाजानुसार पर्जन्यमान कमी होत असल्याने आंबा, काजू इ. रोपवाटिकेला पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळया/ कुकुटपालन** | – | • जनावराना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामधे हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी झुडूपवर्गीय व बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरणी द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३–४ किलो हिरवा चारा, २ ते २.५ किलो वाळलेला चारा व ३०० ग्रॅम खुराक प्रतिदिन दयावा.<br>• जनावरांचे येणाऱ्या पावसापासून योग्यते संरक्षण करावे.<br>• ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे म्हणजेच चार–सहा आठवडयांपर्यंत ब्रॉयलर फीनीशर खाद्य द्यावे. |
| **सुचना** | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |